# विधायक



**अमेरिकेत स्थाईक झालेल्या मराठीजनांनी मराठीचा वारसा पुढे चालू राहावा यासाठी तेथे मराठी शाळा स्थापन केल्या आहेत व तेथे आता १५०० मुलं मराठी शिकतात. मराठी नाटके, सणही तेथे साजरे करतात.**

# शिवाजी म्हणतो, शिकागोच्या शाळेत भेटा...

## अमेरिकेत बीएमएमच्या मराठी शाळा लोकप्रिय

विशेष प्रतिनिधी

Simon Says हा खेळ पूर्वी आमच्या मुलांना माहिती असायचा. पण आता त्यांना शिवाजी म्हणतो, हा खेळ माहीत झाला आहे... शिवाजीमहाराजांचा जन्म, अफझलखानाचा वध असा २०-२० मिनिटांच्या छोट्या छोट्या नाटिका बसवल्यामुळे शिवाजी कोण याच्याशी त्यांची ओळख पटली आहे... शिकागोत गेल्या दोन दशकांपासून वास्तव्याला असलेल्या डॉ. विद्या जोशी सांगत होत्या. अमेरिकेतील विविध शहरांमधील मराठी पालकांच्या साप्ताहिक उपक्रमांमध्ये आता मराठी शाळा हा एक हवाहवासा उपक्रम जोडला गेला आहे. भाषा हे संस्कृतीचे माध्यम असते, हे या रविवारच्या मराठी शाळांमधून आता अधोरेखित होत आहे.

व्यवसाय व शिक्षणाने होमिओपथिक डॉक्टर असलेल्या विद्या जोशी शिकागोत मराठी शाळेशी जोडल्या गेल्या आहेत. शिकागो मराठी शाळेला गेल्याच वर्षी बीएमएम अधिवेशनात पुरस्कार मिळाला होता. सध्या मातृभूमी मुंबईत आलेल्या डॉ. विद्या जोशी यांनी अमेरिकेत विस्तारलेल्या मराठी शाळांच्या वटवृक्षाविषयी फार रोचक अशी माहिती सांगितली. विशेष म्हणजे अनेक राज्यातील मराठी शाळांना आता परकीय भाषा शिकण्याचा अधिकृत दर्जा मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना त्यावर क्रेडिट पॉइन्ट्स कमावण्याची संधी झाली आहे. साहजिकच पिढीजात भाषा-संस्कृती शिकण्याची वारी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीतही लाभदायी होत आहे.

आतापर्यंत उत्तर अमेरिकेत स्पॅनिश, फ्रेंच, मँडरीन व भाषांचा समावेश वर्ल्ड लँग्वेज किंवा सेकंड लँग्वेज या सदरात होत होता. अमेरिकेत माध्यमिक शाळा (हायस्कूल) आणि विद्यापीठात शिकणाऱ्या मुलांना या भाषांचे सेकंड लँग्वेज क्रेडिट मिळते. अलिकडेच अमेरिकेतील ५१ राज्यांपैकी बऱ्याच राज्यांमध्ये व्हिएतनामी, अरेबिक व भारतीय भाषांपैकी तेलुगू व तमिळ भाषांना अशी मान्यता प्राप्त झाली आहे. अमेरिकेत बृहन्महाराष्ट्र मंडळाने 'बीएमएम मराठी भाषा शाळा' उपक्रम सुरू केला, त्यास आता १२ वर्षे पूर्ण होत आहेत. या एका तपात काही मराठी शाळांच्या शाखांनी राज्यातर्फे देण्यात येणाऱ्या प्रमाणनतेसाठी प्रयत्न सुरू केले. अटलांटा येथील शाळेला २०१५ मध्ये जॉर्जिया राज्यातर्फे प्रमाणित केले आहे. आता इथल्या विद्यार्थ्यांना मराठी शाळेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर हायस्कूलसाठी फॉरेन लँग्वेजचे क्रेडिट मिळते. २०१६ मध्ये शिकागो येथील शाखांना इलिनॉय राज्यातर्फे अशीच मान्यता मिळाली. यासाठी स्थानिक शाळेची समिती, स्वयंसेवक व शिक्षक यांनी भरपूर परिश्रम घेतले. नुकतेच टेक्सास राज्यातील काही ठिकाणी हायस्कूलसाठी मराठी भाषेचे फॉरेन लँग्वेज क्रेडिट मिळाले. इतरही राज्यात असे प्रयत्न सुरू आहेत.

अमेरिकेतील मराठी शिक्षणाच्या उपक्रमाविषयी बीएमएम मराठी शाळा समितीच्या पदाधिकारी कोमल चौकर यांनी सांगितले, की २००७ मध्ये फिलाडेल्फिया येथील बीएमएम २०२० शिखरपरिषदेत मराठी भाषा शिकवण्यासाठी बीएमएम मराठी शाळेच्या उपक्रमास मान्यता मिळाली. त्यासाठी वेगळी समिती स्थापन करण्यात आली. त्यात कॅनडामध्ये हा प्रयोग प्रथम करणाऱ्या सुनंदा टुमणे यांच्यासह काही मराठी भाषा जाणकार होते. या सर्वांनी मराठी भाषा जाणकार, आंतरराष्ट्रीय भाषा अभ्यासक्रम सूची, पाठ्यपुस्तक महामंडळ आणि अनेक अनुभवी शिक्षकांच्या मदतीने बीएमएम मराठी शाळेसाठी त्रिस्तरीय मराठी भाषा अभ्यासक्रम तयार केला. या अभ्यासक्रमाला भारती विद्यापीठ, पुणे यांची मान्यता मिळाली. बीएमएम आणि भारती विद्यापीठ, पुणे यांच्यात उत्तर अमेरिकेत सर्वत्र एकछत्री मराठी शाळा उपक्रम सुरू करण्याबाबत करार झाला. बीएमएम मराठी शाळेने उत्तर अमेरिकेतील सात महाराष्ट्र मंडळात प्रयोगात्मक मराठी भाषा शाळा सुरू केल्या. २००७ मध्ये बनवलेला त्रिस्तरीय मराठी भाषा अभ्यासक्रम २०११ मध्ये पाच स्तरांत करण्यात आला. या अभ्यासक्रमानुसार आता प्रत्येक स्तर पार करण्यासाठी १२० शैक्षणिक तास इतके मराठी भाषेचे शिक्षण आवश्यक आहे.

डॉ. विद्या जोशी यांनी सांगितले, की या शाळांमध्ये हसतखेळत मराठी शिकवले जाते. शिवाजीमहाराज, संत ज्ञानेश्वर अशा व्यक्तिरेखाविषयीची नाटके आम्ही बसवतो. त्या मुला-मुलींना त्यांनी साकारलेल्या पात्रांच्या नावेही कधीकधी ओळखले जाते. या हलक्याफुलक्या क्षणांमुळे शाळेत येणे, हा मराठी मुलांसाठी आनंददायी ठरते. कंदील, गुढी बनवणे, दिवाळीची आरास, चिकणमातीपासून गणपतीची मूर्ती तसेच विटीदांडू, लगोरी, उभा खोखो, हुतूतू यासारखे खेळ, सूर्यनमस्कार, योग, मल्लखांबाची प्रात्यक्षिके असे क्रीडाप्रकारही अंतर्भूत असतात. बीएमएम मराठी शाळा समिती वार्षिक दिवाळी अंकही प्रकाशित करते. मराठी भाषा हे आपली संस्कृती आपल्या मुलांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे साधन झाले आहे. पूर्वी आमची मुले भारतात यायची, तेव्हा त्यांची भावंडे, आजी-आजोबा व इतर नातलग यांच्याशी संवाद साधताना अडचणी यायच्या. आता भाषा आणि संस्कृती या दोहींचा दुरावा त्यांच्या मनात नसतो. आपल्या संस्कृतीशी त्यांची लहानपणापासूनच ओळख झालेली असते.

मराठी शाळा चालवणे हे मात्र अमेरिकन मराठीजनांसाठी मोठे परिश्रमाचे काम असते. शाळा ज्या इमारतीत चालते, त्याला अग्निशमनाचे प्रमाणपत्र गरजेचे असते. काही वेळा जागा भाड्यावर घ्याव्या लागतात किंवा कम्युनिटी सेंटरमध्ये या शाळा चालवल्या जातात. या सगळ्यासाठी बांधिलकी बाळगून वेळ काढावा लागतो. अनेक कार्यकर्ते हे योगदान देत आहेत. त्यामुळेच आज १५०० विद्यार्थी मराठी शाळांमध्ये मराठी शिकत आहेत. लवकरच उत्तर अमेरिकेतील बीएमएम मराठी शाळेच्या सर्व शाखांतील विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसांचे शिबीर आयोजित करण्याचा बीएमएमचा मानस आहे. सर्व ३६ मंडळांच्या शाखांना त्या राज्याचे प्रमाणन मिळावे, असा प्रयत्न सुरू आहे. तसेच, या राज्यांमध्ये seal of bi-literacy मराठी भाषेला प्राप्त व्हावे व बीएमएम मराठी शाळेला स्थानिक विद्यापीठांची मान्यता मिळावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. अमराठी सदस्यांना मराठी भाषा व संभाषण शिकवण्यासाठी ऑनलाइन मराठी शाळा सुरू करण्याचाही बीएमएमचा मानस आहे.